# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## गोवर्धन (ता.जि.नाशिक) येथील कलाग्रमच्या उर्वरित कामांसाठी प्रशासकीय मान्यता देवून काम सुरु करणेबाबत

**(१) ४९४९० (२१-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवर्धन (ता.जि.नाशिक) येथील कलाग्रामच्या उर्वरित कामांसाठी प्रशासकीय मान्यता देवून सदर काम सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री पर्यटन यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील कलाग्रामच्या अपूर्ण कामांना निधी मिळण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ मुंबई यांनी दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ रोजी शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुषंगाने नाशिक येथील कलाग्राम या प्रकल्पाचे प्रलंबित कामांना निधी मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही

(२) होय, हे खरे आहे.

(३) पर्यटन विभाग, शासन निर्णय दि.२८/०६/२०२२ अन्वये रु.४००.०४ लक्ष इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांची स्थगिती शासन निर्णय दि.०५/०१/२०२३ अन्वये उठविण्यात येऊन रु.१२०.०० लक्ष निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी व हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना हरभरा खरेदीची रक्कम मिळण्याबाबत

**(२) ५१३४६ (२७-०१-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्हयातील ७ हजार क्विंटल हरभऱ्यांची शासनामार्फत नाफेडने खरेदी करुनही अद्याप त्याची रक्कम येथील शेतकऱ्यांना अदा केलेली नाही व त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन येथील शेतकऱ्यांची थकीत रक्कम शेतकऱ्यांना तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२६-०६-२०२४) :** (१) हंगाम २०२१-२२ मध्ये दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. यांनी नाफेडच्या वतीने परभणी जिल्हयातील (०८) खरेदी केंद्रावर १,३९,५२०.४० क्विंटल चना खरेदी केलेली असून केंद्र शासनाच्या हमीभाव रु.५२३०/- प्रति क्विंटल प्रमाणे एकूण रुपये ७२,९६,९१,६९२/- इतके पेमेंट शेतकऱ्यांना दि.२५.०३.२०२२ ते दि.२८.०७.२०२२ पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर अदा केले आहे.

त्याचप्रमाणे हिंगोली जिल्हयामध्ये हंगाम २०२१-२२ मध्ये नाफेडच्या वतीने ८ खरेदी केंद्रावर १,४४,७८६.२६ क्विंटल हरभरा खरेदी केलेला असून त्याचे पेमेंट केंद्र शासनाचे आधारभूत किंमत खरेदी योजना हमीभाव रुपये ५२३०/- प्रति क्विंटल प्रमाणे रु. ७५,७२,३२,१३९.८०/- इतके पेमेंट संपूर्ण शेतकऱ्यांना दिनांक २५.०३.२०२२ ते २८.०३.२०२२ पर्यंत ऑनलाईन पोर्टलवरुन अदा करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांची हरभरा पेमेंट बाबत कोणतीही तक्रार जिल्हा मार्केटिंग अधिकारी, परभणी/हिंगोली यांचे कार्यालयास प्राप्त झाली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेमध्ये सुमारे ६० टक्के पदांचा अनुशेष असल्याबाबत

**(३) ५१४१५ (२०-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीयांची सर्व प्रकारची एकूण ५००१ पदे मंजूर असून त्यापैकी ३ हजार पदे रिक्त असल्याचे दिनांक ३० जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच खुल्या प्रवर्गातील २०६२ पदे मंजूर असुन १३५४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदांमुळे नागपूर महानगरपालिकेतील कामकाजावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेवून येथील रिक्त पदांचा आढावा घेवून तातडीने सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) नाही,

नागपूर महानगरपालिकेतील दि. ३० जून २०२२ रोजीच्या स्थितीनुसार मागासवर्गाचे मंजूर, कार्यरत व रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| एकूण | ७५९३ | ५३०२ | २२९१ |

(२) नाही,

खुल्या प्रवर्गातील मंजूर, कार्यरत व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| एकूण | ३८११ | १८५७ | १९५४ |

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) व (५) शासनाने सरळ सेवेतील आवश्यक पदे भरण्याकरीता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग पत्र क्रमांक

संकिर्ण-११२३/प्र.क्र. २९/नवि-२६ दि. १४/०२/२०२३ नुसार आस्थापना खार्चाची ३५ टक्के खर्च मर्यादेची अट शिथील करुन तूर्तास आवश्यक असलेल्या ८५३ पदांची पदभरतीस मान्यता दिली आहे.

८५३ पदांपैकी पहिल्या टप्यात अग्निशमन व आणीबाणी सेवा या विभागाच्या एकूण ३५० पदांची पदभरतीची कार्यवाही सुरु असुन या संबंधाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क. प्रानिम १२२२/प्र.क्र. १३६/का.१३-अ, दि. २१/११/२०२२ अन्वये टाटा कन्सलटंसी कंपनी सोबत ३ वर्षाचा करारनामा झालेला असून भरती प्रक्रिया बाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**सांगवी - बरबडी ते पालम (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ५२४०१ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगवी - बरबडी ते पालम (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याच्या डांबरीकरण व मजबूतीकरणाचे काम गत २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) फरकंडा ते बरबडी ही लांबी राज्य मार्ग ४४२ चा भाग असून सदर लांबीत वार्षिक देखभाल व दूरुस्ती कार्यक्रमांतर्गत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.

फरकंडा ते पालम ही लांबी राज्य मार्ग २३५ चा भाग असून सदर रस्त्यावरील डांबरीकरणाचे काम HAM योजने अंतर्गत पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.

---

**यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय रूग्णालयाच्या प्रांगणामध्ये महिलेची प्रसुती झाल्याबाबत**

**(५) ५३०३४ (२१-०१-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयामध्ये प्रसुतीकरीता दाखल करण्यात आलेल्या श्रीमती प्रतीक्षा पवार यांची दिनांक ११ ऑक्टोंबर.२०२२ रोजी वा त्यासुमारास रूग्णालयाच्या प्रांगणामध्ये प्रसुती झाली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर महिलेची रूग्णालयाचे प्रांगणामध्ये प्रसुती होण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१), (२) व (३) सदर रुग्णाची प्रसुती रुग्णालयाच्या प्रांगणामध्ये झाल्याचे निदर्शनास आल्याने याबाबीची संस्थास्तरावर चौकशी केली असता, त्यामध्ये रुग्णाची प्रसुतीची दुसरी वेळ असल्याने प्रसुती लवकर होऊ शकते असे रुग्णाला सांगितल्यावरही रुग्ण डॉक्टरांची नजर चुकवून तेथून बाहेर गेला व रुग्णालयाच्या बाहेर मुख्य प्रवेशद्वाराजवळ दि.२२/१०/२०२२ रोजी रुग्णाची प्रसुती झाली असल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल मंजुर लाभर्थ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(६) ५४९८९ (२९-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्व्हे होऊन पात्र व लाभ देय असणाऱ्या लाभार्थींची 'ड' यादी तयार करण्यात आल्यानुसार प्राधान्य क्रमाने लाभ देण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेचा सर्व्हे साधारणपणे ५ वर्षांनी केला जात असून उक्त यादीमध्ये समाविष्ट नसणारी मोठी लोकसंख्या आहे ज्यांना घरकुलांची आवश्यकता असून त्याचा समावेश अन्य कोणत्याही घरकुल योजनेत होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, त्यानुषंगाने या सर्व योजनांमध्ये पात्र न होणारी अनेक इतर मागास प्रवर्ग व खुला प्रवर्गातील आर्थिक दुर्बल कुटुंबे घरकुलांच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात घरकुल योजनेचे उद्दिष्ट वाढवून वंचित राहिलेल्या इतर मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गातील कुंटुंबाकरीता नवीन घरकुल योजना सुरु करण्याबाबत तसेच प्रधानमंत्री आवास योजनेत दरवर्षी सर्व्हे करुन समाविष्ट करण्याची व्यवस्था तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांकरिता मोदी आवास योजना इतर मागास बहूजन कल्याण विभागाच्या दि. २८.०७.२०२३ व दि. २७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या वर्षामध्ये २,५६,९८२ एवढया लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत पहिला हफ्ता वितरित करण्यात आला आहे.

तसेच राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण राबविली जाते. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांची निवड ही सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण (SECC-२०११) नुसार तयार करण्यात आलेल्या जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट (GPL) ग्रामसभेपुढे ठेवून ग्रामसभेने मान्यता दिलेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून केली जाते.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांची नावे जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट (GPL) मध्ये समाविष्ट नव्हती, त्यांचे साठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या सुचनेप्रमाणे व ग्रामसभेच्या मान्यतेने स्वतंत्र "ड" यादी तयार करण्यात आली. या यादीतील लाभार्थ्यांचे सर्वेक्षण आवास प्लस ॲपद्वारे करण्यात आले असून ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांच्या सूचनेनुसार ग्रामसभेच्या मान्यतेने याद्या अंतिम करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांनी पदोन्नती ऐवजी पदावनत करण्यात आल्याबाबत**

**(७) ५५१९६ (१८-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांनी पदोन्नती ऐवजी पदावनत करण्याबाबत मागणी केल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत येणाऱ्या अडचणी, मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त पदभार, शिक्षक वादविवाद ताण-तणाव, दैनंदिन पत्र व्यवहारासाठी करावा लागणारा प्रवास या बाबींमुळे अनेक मुख्याध्यापक पदवीधर शिक्षक व शिक्षिका त्रस्त होऊन अनेकांना रक्तदाब, मधुमेह इतर आजार झाल्याने पदावनत करा अशी मागणी करण्यात आली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणी करणाऱ्या जवळपास शंभर पेक्षा अधिक शिक्षकांचे अर्ज प्रशासनाकडे पडून असून याबाबत कार्यवाही झाली नसल्याचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष यांनी व्यक्त केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
पदवीधर प्राथमिक शिक्षकांनी खाजगी व वैयक्तिक कारणास्तव पदावनत करण्याबाबत मागणी केली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती जाहिरात दि.५.१.२०२४ रोजी देण्यात आली असून, सदरील जाहिरातीमध्ये ११० प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदाची माहिती नोंदविण्यात आली. त्यानुसार पवित्र पोर्टलव्दारे ११० उमेदवारांची यादी प्राप्त झाली. औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत पदवीधर प्राथमिक शिक्षकातून पदावनतीने प्राथमिक शिक्षकांची मागणी केलेली शिक्षक संख्या ही १३१ आहे. सद्य:स्थितीत पदवीधर प्राथमिक शिक्षकांना पदावनत करुन प्राथमिक शिक्षक या पदावर दिल्यास प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरिक्त होतील त्यामुळे संबंधितास पदावनत करता येणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे रुग्णांची नोंद व व्यवस्थापन करणारी ऑनलाईन आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली बंद असल्यामुळे होणारी गैरसोय

**(८) ५७१३२ (२८-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे रुग्णांची नोंद व व्यवस्थापन करणारी ऑनलाईन आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली मागील पाच महिन्यांपासून बंद असल्याने रुग्ण, नातेवाईक व डॉक्टरांची गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रणाली बंद असल्याने राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णांना केस पेपर, तपासणी पेपर मिळण्यासाठी विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ससून रुग्णालयातील सर्व संगणक विनावापर असल्याचे ही निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरातील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अस्वच्छतेमुळे रुग्णांच्या आरोग्यसेवेवर होत असलेला परिणाम

**(९) ५७२६२ (२८-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वार्डांमध्ये अस्वच्छता असल्याने त्याचा परिणाम रुग्णांच्या आरोग्यसेवेवर होत असल्याचे दिनांक ८ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय परिसरात मोकाट कुत्रे, वराह यांचा मुक्त संचार, जैविक कचऱ्याचे उघड्यावर विल्हेवाट लावणे व रस्त्यांची दुरावस्था झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

(३) शासनाकडून रुग्णालय परिसराच्या संरक्षण भिंतीसाठी व परिसरातील रस्त्यांच्या बांधणीकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्याकरीताचा अनुक्रमे १०.०७ कोटी व ८.४७ कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. यापुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड शहरातील रस्त्यांचे रुंदीकरणे व दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) ५८०३२ (२५-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड शहरातील अरुंद रस्ते तसेच सवणस-अणसुरे, बलदेवाडी रस्त्याची झालेली दुरुवस्था यामुळे वाहतुकी कोंडी होत असल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड शहराचा मुख्य रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने निधीची तरतूद करुन खेड शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण व दुरुस्ती करुन वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२४) :** (१) वाहतूक कोंडी होते, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दापोली वाकवली साखरोली खेड भरणे रस्ता रा.मा. १६२ च्या कि.मी. ०/०० ते २९/०२० या संपूर्ण लांबीमध्ये HAM अंतर्गत रु.१३८०६.०० लक्ष किंमतीचे काम मंजूर आहे. या कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सवणस –अनास्पुरे बलदेवाडी हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग असा दर्जोन्नत होऊन सा.बां.विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे. या रस्त्यावर २ किमी लांबी सुस्थित आहे, ४.४ किमी लांबीतील कामे प्रगतीत आहेत व उर्वरित लांबीत वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्तीची कामे करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हाफकीन संस्थेतर्फे करण्यात येणाऱ्या ओषध खरेदी प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(११) ६०५५८ (२८-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औषध खरेदीत वारंवार होणारे गैरव्यवहार रोखण्याबरोबरच वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभागाच्या रुग्णालयांना वेळेवर औषधे मिळावी यासाठी शासनाने औषध खरेदीची स्वतंत्र जबाबदारी हाफकिन या संस्थेवर सोपवली असून औषध खरेदी कक्षाची निर्मिती झाल्यापासून मागील तीन वर्षात १३ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असून व्यवस्थापकीय संचालक वारंवार बदलत असल्याने औषध खरेदीसह महत्त्वाच्या प्रक्रिया वेळेवर पूर्ण होण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तमिळनाडू राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमध्ये राबवण्यात आलेले मॉडेल आदर्श असून तेथे रुग्णालयांना औषधांची उपलब्धता किती हवी आहे याचा अंदाज वर्षाच्या सुरुवातीला दिला जात असून तिथे एका प्रशासकीय अधिकारी ऐवजी पाच जणांची समिती एकत्रितरित्या काम करत असल्याने उत्कृष्टरित्या रुग्णालयांना औषध पुरवठा करता येणे शक्य होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बऱ्याच वेळा हाफकीनला निधी उपलब्ध झाल्यानंतर औषधांची मागणी व नोंदणी ठरत असून राज्याला आवश्यक असणाऱ्या औषधांपेक्षा अतिरिक्त औषध मागवली जात असल्याने बऱ्याच वेळा कोट्यावधी रुपयांची औषधे फेकून देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासकीय गोंधळ, सरकारी हस्तक्षेप, औषधाच्या खरेदी प्रक्रियेमध्ये नसलेला पारदर्शीपणा या सर्वांचा एकत्रित परिणामामुळे रुग्णांना निकृष्ट दर्जाची औषधे दिली जात असल्याने सदर औषध खरेदी प्रक्रियेत सुधारणा आणण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** **(**१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

(३) व (४) शासकीय रुग्णालयात औषध पुरवठा नियमितपणे होण्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१०/५/२०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण अधिनियम, २०२३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्राधिकरणामार्फत औषधे खरेदी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत सन २०१९-२१ व सन २०२१-२२ मध्ये घरकुल मंजुर असलेल्या नागपूर विभागातील लाभार्थी लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(१२) ६०५८७ (०८-०५-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतील सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीतील नागपूर विभागातील घरकुल मंजुर असलेले लाभार्थी लाभापासून वंचित असल्याचे विभागीय आयुक्त नागपूर यांचे दिनांक ०९ डिसेंबर २०२२ च्या बैठकीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागातील मंजूरीप्राप्त लाभार्थी घरकुलाचा बांधकामाचा उर्वरीत हप्ता खात्यात जमा झाला नसल्याची बाब माहे दिनांक १० डिसेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विभागातील लाभार्थ्यांना शासनाकडुन घरकुलाचे बांधकाम मंजुरीच्या वेळेस पहीला हप्त्याची रक्कम खात्यात जमा झाल्यानंतर उर्वरीत हप्ता जमा झालेला नसल्याने तसेच अलीकडे रेतीघाटाचा लिलावास विलंबामुळे तसेच सिमेंट, गिट्टी, विटा यांचे भाव गगनास भिडल्याने गरीब घरकुल लाभार्थींना घरकुलाचे बांधकाम करणे आर्थिकदृष्टया फारच अडचणीचे ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील घरकुल मंजुर असलेल्या लाभार्थींना घरकुलाचा बांधकामाची उर्वरीत रक्कम जमा करण्यास व रेती घाटांच्या लिलावास होत असलेल्या विलंबावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीतील मे. थर्मोलॅब हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीने कार्यरत असलेल्या ३२ कामगारांना अचानक कामावरून कमी केल्याबाबत**

**(१३) ६१८५३ (२७-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीतील थर्मो लॅब या कंपनीने कार्यरत असलेल्या ३२ कामगारांना अचानक दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास कामावरून कमी केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कार्यरत असलेल्या ३२ कामगारांना अचानक कमी करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त कामगारांना नियम व अटीनुसार कामावरून काढण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार नियमांचे उल्लंघन करून कामगारांना कमी केल्याप्रकरणी कंपनीविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०४-०७-२०२४) :** (१), (२), (३) व (४) मे. थर्मोलॅब हेल्थ केअर प्रा.लि. कंपनीच्या उत्पादनाला लागणारा कच्चा माल व पॅकींग मटेरियल पुरविणाऱ्या कंपनीने स्वतःचे उत्पादन सुरु केल्याने सदर कंपनीमध्ये सरासरीपेक्षा अल्प प्रमाणात काम उपलब्ध होऊ लागल्याने उत्पादन कमी झाले, त्यामुळे व्यवस्थापनाकडे कामगारांकरीता काम उपलब्ध नसल्याने कामगारांना कामावरुन कमी केल्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे. सदर प्रकरणी भारतीय मजदूर संघ यांनी सहायक कामगार आयुक्त, रत्नागिरी यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने उभयपक्षांची सहायक कामगार आयुक्त, रत्नागिरी यांनी वेळोवेळी बैठका आयोजित करुन व्यवस्थापन व कामगार प्रतिनिधी यांच्यामध्ये तडजोड करण्यात आल्याने ३२ कामगारांना एकूण रु.८०,९८,२८५/- इतकी कायदेशीर देय रक्कम देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर आस्थापनेवर कोणीही कामगार काम करीत नसून उक्त नमूद कामगारांचा कायदेशीर देय रक्कमेबाबतचा विवाद संपुष्टात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) मध्ये रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत.**

**(१४) ६२८०७ (२८-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) मध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना खाटा उपलब्ध नसल्याचे सांगत मेडिकल-मेयो रुग्णालयात पाठवले जात असल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे दाखल होणाऱ्या रुग्णांनाही शस्त्रक्रियेसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालय प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर हे आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे रुग्णालय आहे. सदर रुग्णालयामध्ये जवळपासच्या जिल्ह्यांमधून तसेच नागपूर जिल्ह्यातील एम्स व इतर रुग्णालयांमधून उपचाराकरीता रुग्णांना संदर्भीत केले जाते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात संवर्ग एक मध्ये शासन आदेशानुसार संवर्गातील शिक्षकांना बदलीमध्ये सवलती देणेबाबत**

**(१५) ६२९३७ (०३-०५-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात संवर्ग एक मध्ये अपंग शिक्षक, अपंग मुलांचे पालक अशा शिक्षकांचा समावेश होतो, शासन आदेशात या संवर्गातील शिक्षकांना बदलीत सवलत द्यावी तसेच त्यांच्या सोयीनुसार बदल्या करण्यात याव्या. त्याचबरोबर बदली प्रक्रियेत त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना आहेत, त्यामुळे अनेक शिक्षकांनी स्वतःची तर काहींनी आपले पाल्य दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र जिल्हा परिषदेला सादर करून संवर्ग १ चा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जन्मत: दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींची दिव्यांग प्रमाणपत्र मिळवतानाची असणारी कार्यपध्दती पाहता, बनावट दाखले घेणारे शिक्षक अथवा समाजातील धडधाकट नागरिक व दाखले देणारी यंत्रणा यांनी खऱ्या दिव्यांग व्यक्तींवर अन्याय केल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नेमके किती खरे व बनावट अपंग आहेत, याबाबत खात्री करण्यासाठी बुलढाणा जि प मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी फिटनेस प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी एका संघटनेच्या पदाधिकाऱ्याने सोशल मीडियाद्वारे आवाहन केले आहे की "७ हजार रुपये १० फेब्रुवारी पर्यंत जमा करा आणि प्रमाणपत्र बोगस नसल्याची हमी घ्या." हा मेसेज समाजमाध्यमावर फिरत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सोशल मीडियावर फिरत असलेला मेसेज हेच सिद्ध करत आहे की बुलढाणा जि.प.मधील अनेकांची प्रमाणपत्रे बनावट आहेत, अशी कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने बनावट दाखल्यांचे वितरण यापुढे न होण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे
(७) असल्यास, उक्त प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने सुमोटो दखल घेऊन संबंधितांच्या विरोधात शासनाने आजतागायत केलेली कारवाई अथवा याबाबत शासनामार्फत लावण्यात आलेली उच्चस्तरीय चौकशी भविष्यात प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०५-२०२४) :**(१) हे खरे नाही.
(२) राज्यात जन्मत: दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींची दिव्यांग प्रमाणपत्र मिळवतानाची असणारी कार्यपध्दती पाहता, जिल्हा परिषद, बुलढाणांतर्गत सद्य:स्थितीत अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) होय, हे खरे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२२.०६.२१७ नुसार निर्देश देण्यात आले होते.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.
(८) दिव्यांग कर्मचाऱ्यांची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करणेबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि.२२.०६.२०१७ रोजीच्या पत्राविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४७८४/२०१७ दाखल केली. तसेच सेवेत रुजू झाल्यानंतर दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून तपासणी करुन सादर करण्याकरिता दि.०३.०२.२०२३ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले होते. परंतु सदर पत्राविरुध्द मा.न्यायालयात रिट याचिका क्र. १५४९/२०२३ दाखल करण्यात आली असून दोन्ही याचिकांवरील अंतिम निर्णय अद्यापपर्यंत प्रलंबित असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही यास्तव सदर प्रकरणावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## सातारा जिल्हयातील बरेच वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी न राहता तालुक्याच्या किंवा जिल्हयाच्या ठिकाणी राहत असल्याबाबत

**(१६) ६५७०४ (२५-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य सेवा ही अत्यावश्यक व महत्वपूर्ण सेवा असल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी थांबणे बंधनकारक असतांना सातारा जिल्हयातील बरेच वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी न राहता तालुक्याच्या किंवा जिल्हयाच्या ठिकाणी राहत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार जे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयात राहत नाहीत त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०६-२०२४) :** (१) माहे एप्रिल, २०२३ मध्ये अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण किनारपट्टीवर जोडधंदा म्हणून पर्यटन व्यवसाय करणाऱ्या स्थानिक नागरिकांकडून शासन दंड वसुली करत असल्याबाबत

**(१७) ६५८७६ (२३-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवर राहणारे नागरिक आपल्या राहत्या घराच्या मोकळया खोल्यांमध्ये वा जागेवर न्याहरी, निवास, कृषी पर्यटन, होम स्टेच्या माध्यमातून जोडधंदा म्हणून पर्यटन व्यवसाय करीत असून वर्षातील ८० ते १२० दिवस पर्यटन व्यवसाय सुरु असतांना महसूली अधिनियमाचा वापर करुन ३६५ दिवसांची दंड वसूली अशा पर्यटन व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र महसुली अधिनियमानुसार पर्यटन व्यावसायीकांकडून अवास्तव्य दंडात्मक रक्कम आकारण्यात येऊ नये अशी मागणी कोकण पर्यटन व्यावसायिक महासंघ, तारकर्ली पर्यटन व्यावसायिक या संस्थेतर्फे नायब तहसिलदार, मालवण यांच्याकडे प्रत्यक्ष भेट घेऊन व लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी मध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पर्यटक व्यवसायिक महासंघ, कोकण यांनी दि.२७/०३/२०२३ रोजी महसूल विभागास निवेदन सादर केले आहे.

(३) सदर निवेदनाबाबत महसूल विभाग व पर्यटन व्यवसायिक यांच्यातील चर्चेन्वये सद्यस्थितीत म.ज.म. अधिनियम १९६६ कलम-४५ (२) अन्वये पर्यटक व्यवसायिकांकडून आकारण्यात आलेला दंड वसुल न करण्यातबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## विदर्भात नागपूर अपर कामगार आयुक्त कार्यालयातील मंजुर पदांपैकी ७२ पदे रिक्त असल्याबाबत

**(१८) ६६९६४ (२३-०८-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर अपर कामगार आयुक्त कार्यालयातील १३८ मंजुर पदांपैकी ७२ पदे रिक्त असल्याने कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजनेचा लाभापासून कामगारांना वंचीत राहावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार विभागात अपर कामगार आयुक्त-१, सहायक कामगार आयुक्त-४, सरकारी कामगार अधिकारी-१२, दुकान निरीक्षक श्रेणी (१)-६, दुकान निरीक्षक श्रेणी (२)-७, सिपाही-६ अशी इतर एकूण ७२ पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर त्यांचा कामाचा अतिरिक्त भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच सदर योजनेचा लाभ निश्चित वेळेत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२५-०६-२०२४) :** (१) व (२) नागपूर विभागासाठी १३८ मंजूर पदांपैकी माहे मे-२०२३ अखेर ८३ पदे कार्यरत असून ५५ पदे रिक्त आहेत.

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-९ अंतर्गत राज्यसेवा परीक्षा-२०२१ द्वारे शिफारस प्राप्त ठरलेल्या उमेदवारांपैकी ४ सहायक कामगार आयुक्त, गट-अ व ४ सरकारी कामगार अधिकारी, गट-ब संवर्गातील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना नागपूर विभागात प्रशिक्षणासाठी जिल्हा संलग्नता देण्यात आली आहे.
(३) कामगार विभागातील सहायक कामगार आयुक्त, गट-अ व सरकारी कामगार अधिकारी, गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच, गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील रिक्त पदे स्पर्धात्मक परीक्षेद्वारे टि.सी.एस.-आयओएन या कंपनीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै. महाविद्यालय व रुग्णालय, अंबेजोगाई येथील**
**कंत्राटी पध्दतीने वर्ग- ३ व वर्ग- ४ च्या पदे भरतीबाबत.**

**(१९) ६७८७४ (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने वर्ग- ३ व ४ ची पदे भरण्याची परवानगी देण्यात आली आहे तथापि स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै. महाविद्यालय व रुग्णालय, अंबेजोगाई, जि. बीड. येथ अद्याप वर्ग- ३ व ४ ची पदे भरण्याबाबत परवानगी दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पदे रिक्त असल्यामुळे त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होत असल्याने सदर रुग्णालयात आउट सोर्सिंग द्वारे कंत्राटी पद्धतीने वर्ग- ३ व ४ ची पदे भरण्यास परवानगी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दनांक २२ फेब्रुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती. हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई या संस्थेत वर्ग -३ व वर्ग -४ ची कंत्राटी पदे मंजूर नसल्यामुळे सदरची पदे भरण्याची परवानगी देण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड तालुक्यातील पर्यटन स्थळांच्या विकासास निधी मिळणेबाबत**

**(२०) ६८७३४ (२३-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील पर्यटन स्थळांचा निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत विकास करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०२२, तसेच दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पर्यटनस्थळे विकसित करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे ५ कोटी रुपयांची अंदाजपत्रके देखील सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव अवर सचिव पर्यटन याचेकडून पर्यटन संचालनालयाकडे पाठविण्यात आला असून निधी मिळणेबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हयात पर्यटनाचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पर्यटन विभाग, शासन निर्णय दि.१०/११/२०२३ अन्वये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत दौंड तालुक्यातील ५ विकास कामांना रु.५००.०० लक्ष प्रशासकीय मान्यता देऊन रु.१५०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात हिमोफिलियाग्रस्त रूग्णांसाठी 'टर्शरी केअर युनिट' स्थापन करण्याबाबत

**(२१) ६८८९१ (२५-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात हिमोफिलियाग्रस्त रूग्णांना तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीत उपचार घेण्यासाठी एकही 'टर्शरी केअर युनिट' उपलब्ध नसल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे
(३) असल्यास, विदर्भात हिमोफिलियाग्रस्त रूग्णांसाठी 'टर्शरी केअर युनिट' स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) विदर्भातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याशी संलग्नीत शासकीय रुग्णालये टर्शरी केअर श्रेणीतील रुग्णालये आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेत बालरोग विभागात हिमोफिलीयाग्रस्त रुग्णांसाठी टर्शरी केअर सेंटर उपलब्ध आहे. परंतु विदर्भातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याशी संलग्नीत शासकीय रुग्णालयामध्ये हिमोफिलीयाग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र टर्शरी केअर सेंटर उपलब्ध नसले तरी विदर्भातील सर्व शासकीय रुग्णालयामध्ये हिमोफिलीयाग्रस्त रुग्णांना योग्य ते उपचार दिले जातात.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) याबाबत शासनास संबंधित संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत जामखेड (जिल्हा अहमदनगर ) तालुक्यातील प्रादेशिक पर्यटन योजनेतून मंजूर कामांची स्थगिती उठविणेबाबत

**(२२) ७०५९४ (२५-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हास्तरावरील नवीन कामांना दिनांक २८ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली, त्यात मौजे राशीन येथील जगदंबा माता मंदिर प्रशासकीय इमारत व प्रसादालय बांधकाम करणे श्री क्षेत्र संत गीते बाबा देवस्थान खर्डा, तालुका जामखेड येथे मंदिर सभा मंडप, महंत निवासस्थान, प्रसादालय स्वच्छतागृह बांधकाम करणे व श्री क्षेत्र सिताराम बाबा देवस्थान, खर्डा, तालुका जामखेड येथे मंदिर, सभा मंडप, महंत निवासस्थान, प्रसादालय व स्वच्छतागृह मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जगदंबा माता मंदिर राशीन, श्री संत गीते बाबा व श्री संत सिताराम बाबा मंदिर येथे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते तसेच प्रादेशिक पर्यटन विकास योजनेत मंजूर असलेल्या सदर परिसरातील विकास कामांना सद्यस्थितीत स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विकास कामांची स्थगिती उठवण्याबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार करून वारंवार निदर्शनास आणून देण्यात आले आहे तसेच विकास कामांची स्थगिती उठवणे बाबतचा प्रस्ताव विभागाने सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर जगदंबा माता मंदिर राशीन, श्री संत सिताराम बाबा व श्री संत गीते बाबा मंदिर परिसरातील स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पर्यटन विभाग शासन परिपत्रक दि.१२/०१/२०२४ अन्वये सदर कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारूर (जि.बीड) नगरपरिषदेमार्फत सुजल निर्मल अभियाना अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण करणेबाबत**

**(२३) ७०७३३ (०४-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारूर (जि.बीड) नगरपरिषदेमार्फत स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरीता सुजल निर्मल अभियानाअंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर करुन दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पाणीपुरवठा योजना गत ९ वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्यामुळे परिसरातील नागरिकांना योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना पूर्ण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरची योजना तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०६-२०२४) :** (१) होय,
(२) होय,
(३) महाराष्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत मंजूर कुंडलिका पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे इंद्रायणी कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना दि.१५ मार्च, २०१५ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. योजना पूर्ण करण्याचा कालावधी १८ महीने होता. दोन वेळेस ०६ महीने प्रमाणे मुदतवाढही देण्यात आली परंतु कंत्राटदाराने काम पूर्ण केले नाही. त्यामुळे तद्नंतर शासनाच्या निर्देशाप्रमाणे balance work ची नव्याने निविदा प्रसिद्ध करून नवीन कंत्राटदाराची निवड करून कार्यादेश दि.११ जून, २०२१ ला देण्यात आले. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजी नगर येथे दाखल याचिका क्र.४२२१/२०२० वर मा. न्यायालयाने दि.१८.०३.२०२० रोजी दिलेल्या निर्णयानुसार उर्वरित कामाची सुरुवात करण्यापूर्वी याचिकाकर्ता तसेच नवीन कंत्राटदार यांनी पूर्ण झालेल्या कामाची संयुक्त मोजणी करावी, असे आदेश दिले. त्यानुसार याचिकाकर्त्याने पूर्ण केलेल्या कामाची संयुक्त मोजणी करण्यात येऊन उर्वरित कामाची नव्याने निविदा मागवून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेचे ७७ टक्के काम पूर्ण झालेले आहे. माहे

जून, २०२२ पर्यंत योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाणी आले आहे. तद्नंतर योजनेच्या नवीन कंत्राटदारामार्फत भाववाढीची मागणी करुन कंत्राटदाराने जुलै, २०२२ पासून काम बंद केलेले आहे.
(४) व (५) सदर योजना लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. १० जुलै, २०१९ आणि मा. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षेतेखाली दिनांक१३.०२.२०२० रोजी बैठक घेण्यात आली बैठकीत योजना तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्देश देण्यात आले होते. तसेच जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली दि. २३.१०.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली.

सुजल निर्मल अभियानांतर्गत सध्या मंजूर असलेली पाणी पुरवठा योजना ७० LPCD ने असून १३५ LPCD ने करणेसाठी नगर परिषद, किल्लेधारुर, बीड कार्यालयाने (PMC) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेसाठी निविदा प्रक्रीया पूर्ण झालेनंतर सदरील योजना सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन सध्याचे सुजल निर्मल अभियान अंतर्गत पूर्ण् झालेल्या कामाचा समावेश करुन उर्वरित कामासाठी सविस्तर अंदाजपत्रके मान्यतेसाठी शासन निर्णय क्र. सुनिअ/२०१४/प्र.क्र.८/पापु-२२ दि.२३ जानेवारी, २०१४ नुसार नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत सादर करण्यात येणार आहेत.

---

**कल्याण पश्चिम जिल्हा ठाणे येथे तालुका क्रीडा संकुल मंजूर करणेबाबत**

**(२४) ७०९१५ (२५-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पश्चिम (जि. ठाणे) येथे तालुका क्रीडा संकुल नसल्याने गुणवत्ताधारक व होतकरू खेळाडूंच्या सरावाची प्रचंड गैरसोय होत असल्याचे दिनांक ०१ मे, २०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर क्रीडा संकुलाअभावी शालेय कनिष्ठ महाविद्यालय स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात देखील अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तालुक्यामध्ये क्रीडा संकुल मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०७-२०२४) :** (१), (२) व (३) राज्य क्रीडा धोरण २००१ अंतर्गत शासन निर्णय दिनांक २६ मार्च २००३ अनुसार प्रत्येक तालुक्यात एक तालुका क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार कल्याण, जिल्हा ठाणे या तालुक्यासाठी मौजे गोवेली येथे प्राप्त झालेल्या २.५ हे.आर जागेतील सुविधांसाठीच्या रु.१४५.६८ लक्षच्या अंदाजपत्रकास दिनांक २९.३.२०१६ रोजी मंजुरी देण्यात आली असून त्यानुसार रुपये १००.०० लक्ष अनुदान वितरित झाले आहे. त्यातून तिथे ४०० मीटर धावनपथ,कार्यालय इमारत, क्रीडा साहित्य, संरक्षक भिंत इत्यादी सुविधा पूर्ण झाल्याअसून त्याचा वापर स्थानिक विद्यार्थी, खेळाडू आणि नागरिकांकडून होत आहे. त्याचबरोबर या ठिकाणी क्रीडा स्पर्धांचेही आयोजन करण्यात येत आहे. तसेच राज्य क्रीडा विकास समितीच्या दिनांक ६.३.२०२४ रोजीच्या बैठकीत सुधारित अनुदान मर्यादेनुसार कल्याण तालुका क्रीडा संकुलासाठीच्या रुपये ४०० लक्षच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर (जि.पालघर) येथील सरावली खाडी पात्रात घनकचरा टाकल्याने तिवरांची झाडे नष्ट झाल्याबाबत**

**(२५) ७१६१६ (१६-११-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) येथील मुख्य रस्त्यावरील सरावली खाडी पात्रात लाखो टन घनकचरा विसर्जित केला जात असल्याने तेथील तिवरे जवळपास नष्ट होत असल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरावलीत बेकायदा बांधकाम सुरु असल्याने संपूर्ण नागरी वसाहतीतून येणारा घनकचरा विकासक व ग्रामपंचायत गोळा करुन खाडी पात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सरावली खाडी पात्रात लाखो टन घनकचरा विसर्जित करणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील नद्यांवर पूल बांधण्याबाबत

**(२६) ७१६४७ (०६-०३-२०२४). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील काही नद्यांवर गावपाडे जोडण्यासाठी पूल, रस्ते नसल्याने नागरिकांना पावसाळ्यात पाण्याच्या प्रवाहातून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोखाड्यातील देवबांध नदी पार करण्यासाठी पूल नसल्याने भुरिटे व कुर्लोद येथील नागरिकांना लाकडी तराफाच्या मदतीने नदी पार करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उज्जेनी, आखाडा व ओगदा (ता. वाडा) या अतिदुर्गम भागातील अनेक पाड्यांमध्ये जाण्यासाठी आजवर रस्ते तयार करण्यात आलेले नसून गारगाई व पिंजाळी नदीवर पूल नसल्याने जवळपास सहा ते सात पाड्यातील एक हजाराहून अधिक नागरिकांचा पावसाळ्यात इतर गावांशी कोणताही संपर्क होवू शकत नाही. त्याचप्रमाणे जव्हार तालुक्यातील वाघ नदी परिसरातील सावरपाडा, विक्रमगड येथील ब्राह्मणगाव-कुर्झे दरम्यान देहेजें नदीवर अवघे १० फूट उंचीचे पूल पुरामध्ये पाण्याखाली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, जिल्हयाच्या दुर्गम भागातील आदिवासी पाडयांमध्ये जाण्यासाठी नदी-नाल्यांवर पुल अथवा अन्य सुविधा नसल्याने दरवर्षी दोन, चार जणांना जीव गमवावा लागत असून गत दहा वर्षात २५ हून अधिक लोकांचा बळी गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुसार सदर ठिकाणच्या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणून गावपाडयांना जोडणारे रस्ते व नदीवरील पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०२-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मोखाडा तालुक्यातील कुर्लोद गावाकडे जाणा-या रस्त्यावर देवबांध नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत पूल वाहतूकीसाठी सुरु करण्यात आला आहे.

तसेच मोखाडा तालुक्याकडून भुरीटेक गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर देवबांध नदीवर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत पूल वाहतूकीसाठी सुरु करण्यात आला आहे.
(३) व (४) वाडा तालुक्यातील उज्जैनी, आखाडा व ओगदा पैकी उज्जैनी व आखाडा ही गावे राज्य मार्ग ७७ ला लागून आहेत व ओगदा हे गाव राज्य मार्ग ३४ लागून आहेत सदरील दोन्ही रस्ते हे हायब्रिड ॲन्युईटी योजनेअंतर्गत पूर्ण झालेले असून तालुका मुख्यालयाशी जोडलेले आहेत. ज्या गावपाडयांचे रस्ते हे रस्ते विकास योजने अंतर्गत घेण्यात आले आहेत. ते पाडे रस्त्याने जोडण्यात आलेले आहेत.
पिंजाळ नदीवर तसेच गारगाई नदीवर आखाडा भगतपाडा येथे आदिवासी विभागामार्फत बिरसा मुंडा योजने अंतर्गत पूल प्रस्तावित करण्यात आलेला आहे.
तसेच उर्वरित कामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हा परिषदेच्या नियमबाह्य कारभारामुळे मागील २ वर्षात ४७ कोटीहून अधिक निधी खर्च न केल्याने परत गेल्याबाबत

**(२७) ७१७५८ (०५-०३-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा आदिवासी बहुल असून ग्रामीण भाग जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असून वाडया-पाडयावर रस्ते , पाणी तसेच कुपोषणाचा विळखा वाढत असताना पालघर जिल्हा परिषदेच्या नियमबाहय कारभारामुळे मागील २ वर्षात (आर्थिक वर्ष २०२०-२१ व २१-२२) तब्बल ४७ कोटीहून अधिक निधी खर्च न केल्याने परत गेला असून यामध्ये पशुसंवर्धन, लघुपाटबंधारे, आरोग्य, महिला बाल कल्याण व बांधकाम विभागाचाही समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन (२) वर्षामध्ये पालघर जिल्हा परिषदेसाठी एकूण विभागवार किती अनुदान प्राप्त झाले व त्यापैकी किती अनुदान अखर्चीत राहिल्याने निधी परत गेला तसेच सदर निधी अखर्चीत राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर जिल्हा परिषदेच्या विकास कामांसाठी प्राप्त झालेल्या अनुदानांपैकी ४७ कोटी निधी अखर्चित राहिल्यामुळे निधी परत करण्यात आल्यामुळे या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०७-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये विकास योजनांकरीता जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा आदिवासी उपाययोजना, जिल्हा विशेष योजना करीता एकूण रु.३७३.०६ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. प्राप्त निधीपैकी रक्कम रु.४८.४२ कोटी माहे फेब्रुवारी, २०२४ अखेर अखर्चित राहिला आहे. सदर निधी पशुसंवर्धन विभाग, ग्रामपंचायत विभाग, लघुपाटबंधारे विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच कृषी विभाग या विभागाचा अखर्चित निधी आहे.
(२) सदर निधी हा अखर्चित राहण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत :-
(अ) सन २०२०-२१ दरम्यान कोवीड-१९ संसर्ग प्रादुर्भावामुळें व लॉकडाउन झाल्यामुळे अनेक कामांची मंजुरी, निविदा प्रक्रीया व अंमलबजावणी करिता विलंब झाला. प्राप्त निधी रु.१६८.७४ कोटी मधून खर्च रु.१२७.६५ कोटी (७५.६५%)
(ब) जागेची कमतरता, वनविभागातील जागा व जागा मालकीच्या नसणे इ. समस्यांमुळे १९७ कामे रद्द झाली व त्याचा निधी रक्कम रु.११.३८ कोटी त्याचा वितरीत/प्राप्त निधी अखर्चित राहिला.
(क) काही योजनांच्या ई-निविदा प्रक्रियेत न्यूनतम निविदा प्राप्त झाल्यामूळे कामांमध्ये अंतिम खर्च झाल्यानंतरची बचत रकमेचाही या अखर्चित निधीत समावेश आहे.

(ड) जिल्हा परिषदेकडे वितरीत निधी खर्च करण्यासाठी दोन वर्षाची मुदत देण्यात आलेली आहे. तथापि, जिल्हा परिषदेकडून कामाची निवड, प्रशासकिय मान्यता याआधारे जिल्हा नियोजन समिती कडुन निधी वितरण वर्षाच्या मार्च अखेरीस प्राप्त झाला. त्यामुळे पुढील एका वर्षात निविदा प्रक्रिया, काम पुर्ण करुन खर्च करण्यास कालावधी कमी पडला.

(इ) जिल्हा परिषद पालघर अंतर्गत बहुतांश अधिकारी /कर्मचारी संवर्गातील ५० टक्केहून अधिकची पदे रिक्त असल्यामुळे योजनांची अंमलबजावणी व निधीचे विनियोग करण्यात मर्यादा आल्या.

(फ) सन २०२०-२१ या वर्षातील रक्कम रु.४१.०९ कोटी पैकी रु ३९.३३ कोटी निधी शासनास परत करण्यात आलेला आहे. त्यापैकी पुर्ण झालेल्या कामाकरीता रक्कम रू.२१.९४ कोटी आतापर्यंत पुन्हा प्राप्त झाला व खर्च झालेला आहे.

(ग) सन २०२१-२२ मध्ये प्राप्त २०४.३२ कोटी निधीबाबत शासन निर्णय वित्त विभाग दि.२६.१०.२०२३ अन्वये सन २०२१-२२ च्या अखर्चित निधीस फेब्रवारी -२०२४ पर्यंत खर्चाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत रक्कम रु.१९६.९८(९६.४१%) निधी खर्च झाला व रक्कम रु.७.३३ कोटी अखर्चित निधी शासनास समर्पित करण्यात आला.

(३) कोवीड साथरोग कालावधीतील संकट हेच सन २०२०-२१ मधील कामे/योजनांच्या अंमलबजावणीतील मोठी अडचण असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर योजनांमधील चालू कामे पूर्ण करुन अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्यात आला असला तरी पुढील वर्षाच्या नियतव्ययातून दायित्वातून त्यांच्यावर विनियोग करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळजोडणीची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२८) ७१८७३ (१२-०३-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात विशेषत: परभणी, सातारा जिल्ह्यासह शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात पुरेसा पाणीसाठा नसल्याने नागरिकांना पाणी टंचाई व दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी तसेच नळ जोडणीची प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्यासाठी जलजीवन मिशन कार्यक्रम हाती घेतला असून उक्त कार्यक्रमांचा मुख्य उद्देश राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात नळ जोडणी करून स्वच्छ आणि मुबलक पाणीसाठा करणे हा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावपाडयांत व वस्त्यांमधील लाभार्थींना सन २०१८-२०१९ ते सन २०२२-२०२३ या पाच वर्षांत किती नळजोडणी योजनेचा लाभ मिळाला आहे,

(४) असल्यास, शहापूर तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी महत्वकांक्षी बावली नळपाणी पुरवठा योजनेचे काम फार संथगतीने सुरु असून सदर योजनेचा कार्यारंभ आदेश केव्हा देण्यात आला होता व त्याची मुदत किती (कालावधी) आहे, तसेच बावली नळपाणी योजनेच्या कामात बोगस साहित्य वापरण्यात आले असून सदरहू योजनेची मुदत संपून वर्ष उलटून गेले तरी ५०% सुध्दा काम पूर्ण झाले नसून त्या कामांचे देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहापूर तालुक्यासाठी शासनाने रु.३०० कोटी देऊनही तेथे बोगसरित्या काम करणाऱ्या कंपनीची व त्यांना ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्येक घरात नळजोडणी करुन स्वच्छ व मुबलक पाणीसाठा देण्याबाबत मदत करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करुन राज्यात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर गावपाड्यांत व वस्त्यांमधील लाभार्थ्यांना सन २०१८-१९ ते सन २०२२-२०२३ या पाच वर्षांत सातारा येथे ५,३२,६८०, ठाणे येथे ४०,१४७ व परभणी येथे १,१५,७७४ नळजोडणी योजनेचा लाभ मिळाला आहे.
(४) जल जीवन मिशन अंतर्गत शहापूर तालुक्यातील ९७ गावासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मंजुर आहे. सदर योजनेचे कार्यारंभ ओदश दि. ०४.०८.२०२२ रोजी देण्यात आले होते. तसेच योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने व त्यानंतर १२ महिने देखभाल दुरुस्ती असे एकूण ३६ महिन्यांचा आहे. सदर योजनेसाठी आवश्यक साहित्याची वेळोवेळी तपासणी त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत योजनेची भौतिक प्रगती ५२ % व आर्थिक प्रगती ५१% इतकी आहे. स्वीकृत निवेदेननूसार वेळोवेळी झालेल्या कामांची देयके अदा करण्यात आली आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केलेल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना सरकारी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१९) ७१९५० (२९-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केलेल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना सरकारी सेवेत सामावून घेण्याच्या धोरणानुसार प्रतिक्षा यादीतील खेळाडूंना सरकारी सेवेत सामावून घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,
(२) असल्यास, प्रतिक्षा यादीतील किती खेळाडूंना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अखेर नोकरी देण्यात आली व उर्वरित खेळाडूंना सरकारी सेवेत सामावून घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर प्रतिक्षा यादीतील सर्व खेळाडूंना सरकारी सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२५-०६-२०२४) :** (१) व (२) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सदर धोरण निर्गमीत करण्याची कार्यवाही अंतीम टप्यात आहे. सुधारीत धोरण अंतिम झाल्यावर थेट नियुक्ती बाबतची कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.
(३) व (४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

**राज्यात शासकीय दवाखान्यात औषधे उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३०) ७२१११ (०६-०३-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय दवाखान्यात आलेल्या प्रत्येक रुग्णाला सर्व औषधे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर दिली असून त्याबाबत टाळाटाळ करण्याऱ्या रुग्णालयाची तक्रार १०४ या टोल फ्री क्रमांकावर करण्यात यावी असे मा.मुख्यमंत्री यांनी जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयात औषधे मिळत नसल्याच्या ७०० तक्रारी टोल फ्री क्रमांकावर आल्या असून याची कसलीही दखल घेतली जात नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालयात औषधे उपलब्ध करणेसह तक्रार निवारण करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ या दरम्यान राज्यातील एकून १२ जिल्हयांमध्ये १०४ या टोल फ्री क्रमांकावर औषधी मिळत नसल्याबाबतच्या एकूण २६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी २५ तक्रारींचे निवारण स्थानिक स्तरावरुन करण्यात आले आहे व सोलापूर जिल्हयातील ०१ तक्रार प्रलंबित आहे.

(३) प्राप्त तक्रारींबाबत स्थानिक स्तरावरुन वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येऊन तक्रार निवारणार्थ स्थानिक स्तरावरुन प्राथम्याने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रुग्णांना बाहेरुन औषधी खरेदीकरीता चिठ्ठी देऊ नये अशा सूचना स्थानिक स्तरावरुन सर्व संबंधित आरोग्य संस्थांना दिलेल्या आहेत त्यामुळे रुग्णांना औषधे बाहेरुन खरेदी करण्यासाठी रुग्णालयातील डॉक्टरांकडून प्रिस्क्रिप्शन लिहून दिले जात नाही व औषधी उपलब्ध नसल्यास स्थानिक स्तरावरुन खरेदी करण्यात येऊन अथवा, ज्या आरोग्य संस्थांमध्ये जास्तीची औषधे उपलब्ध आहेत त्या आरोग्य संस्थाकडून अत्यावश्यक औषधी उपलब्ध करुन रुग्णांना पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भोस्ते (ता.खेड, जि.रत्नागिरी) घाटातील धोकादायक वळणाबाबत**

**(३१) ७२१५४ (०५-०३-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण कामामध्ये भोस्ते (ता.खेड, जि.रत्नागिरी) घाटातील वळण हे आधीपेक्षा अधिक धोकादायक झाले असून आतापर्यंत २०० हून अधिक अपघात या वळणावर झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघात नियंत्रणात आणण्यासाठी वळणाच्या २०० मीटर अंतरावर तब्बल २० गतीरोधक टाकण्यात आले असून त्यानंतरही अपघात थांबलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक ३० मे, २०२३ व ५ ऑगस्ट, २०२३ तसेच १२ सप्टेंबर, २०२३ या दिवशी महामार्गाची पाहणी करताना सदर धोकादायक वळणाची पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त महामार्गावरील वळण काढून टाकण्याबाबत वा वळण व उताराची तीव्रता कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२४) :**(१) अंशत: खरे आहे.

गृह विभागाच्या अहवालानुसार भोस्ते घाटातील वळणाच्या ठिकाणी सन २०१४ ते २०१३ दरम्यान एकूण ४६ अपघात झाले आहेत.
(२) भोस्ते घाटातील धोकादायक वळणाचे राज्य परिवहन विभाग, रत्नागिरी, स्थानिक पोलिस प्रशासन व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी संयुक्त पहाणी केलेली आहे. भोस्ते घाटामध्ये वळण मार्गाच्या ठिकाणी सुरक्षा तांत्रिक सल्लागारामार्फत सेफ्टी ऑडिट करण्यात आले आहे व त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर ठिकाणी स्पीड ब्रेकर लावणे, दिशादर्शक फलक, सूचना फलक, वेगमर्यादा फलक इ. तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सदर उपाययोजना केल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) होय.
(४) धोकादायक वळणाचे विस्तारीकरण व उताराची तीव्रता कमी करण्यासाठी या प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता यांनी तांत्रिक परिक्षण केले असून सविस्तर प्रकल्प अहवाल रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कार्यालयास मंजुरीसाठी सादर केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## गोळेश्वर (ता.कराड, जि.सातारा) येथील ऑलम्पीकवीर खाशाबा जाधव यांचे राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत

**(३२) ७२२६३ (०१-०३-२०२४). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोळेश्वर (ता.कराड, जि.सातारा) येथील ऑलिम्पीकवीर खाशाबा जाधव राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्याची कार्यवाही प्रलंबित आहे तसेच राज्य क्रीडा दिनाची घोषणा झाली असून याबाबतचा शासन निर्णय झाला नसल्याने राज्य क्रीडा दिनाची कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीमध्ये काय आढळून आले तद्‌अनुषंगाने सदर ३९ वर्षानंतरही अपूर्णावस्थेत असलेले राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र त्वरीत पूर्ण करुन परिसरात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०७-२०२४) :** (१) व (२) स्व. पै. खाशाबा जाधव कुस्ती प्रशिक्षण केंद्र, गोळेश्वर, ता.कराड, जि.सातारा या प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामाकरिता विशेष बाब म्हणून यापुर्वी रू.१००.०० लक्ष इतका निधी वितरीत केलेला आहे. या निधीमधून उपरोक्त जागेवर संरक्षक भिंतीचे काम हाती घेण्यात आले आहे. तथापि काम सुरू असताना जागेसंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्याने सदर काम प्रलंबित आहे. दरम्यान कराड तालुका क्रीडा संकुल समितीमार्फत सदर प्रशिक्षण केंद्राच्या मूळ आराखडे व अंदाजपत्रकात सुधारणा करून लक्षचे अंदाजपत्रक आराखडे सादर करण्यात आले असून त्यामध्ये तेथील विविध कामांचा समावेश आहे. मात्र, या ठिकाणी अतिरिक्त अन्य सुविधांची

मागणी झाल्याने याबाबत सुधारीत अंदाजपत्रक आराखड्यासह उचीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचा दिनांक १५ जानेवारी हा जन्मदिन यापुढे राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २९ डिसेंबर, २०२३ अन्वये शासनाने मंजुरी दिली असून दिनांक १५जानेवारी २०२४ रोजी पहिला राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३३) ७२७४६ (०६-०३-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिवृष्टी आणि पूरस्थितिमुळे नुकसान झालेल्या नागपूर जिल्ह्यातील जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग आणि पुलांच्या दुरुस्तीसाठी नागपूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने गत पाच वर्षात सुमारे ४६२ कोटींची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेने जनसुविधा व नागरी सुविधांच्या निधीतून ग्रामीण रस्ते, पूल यांची कामे व्हावीत याकरिता सुमारे २७० कोटींचे तब्बल साडेपाच हजारांहून अधिक प्रस्ताव जिल्हा नियोजन समितिकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा नियोजन समितीने जनसुविधा व नागरी सुविधांसाठी केवळ ५२ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर केला असल्याने उर्वरित सुमारे २२० कोटींची कामे निधीच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अतिवृष्टी आणि पूरस्थितिमुळे नुकसान झालेल्या नागपूर जिल्ह्यातील जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग आणि पुलांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी नागपूर जिल्हा परिषदेला उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
अतिवृष्टी व पूरहानीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी “अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (३०५४-२९११)” सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून सन २०२२-२३ मध्ये रु.६.९० कोटी व सन २०२३-२४ मध्ये रु.१४६.६२ कोटी रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषदेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये जनसुविधा योजना व नागरी सुविधा योजनेंतर्गत सुमारे रु.३२१ कोटी किंमतीची एकूण ३८६० कामांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला होता. त्यापैकी सुमारे रु.६२ कोटी किंमतीची एकूण ७१२ कामांना मंजूरी मिळाली आहे.
(४) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या ४ वर्षांच्या कालावधीमध्ये नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते/पूलांच्या कामांसाठी खालीलप्रमाणे निधीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत :-

| | | | | **(रु.लक्ष)** |
|---|---|---|---|---|
| **योजनेचे नाव व लेखाशिर्ष** | **२०२०-२१** | **२०२१-२२** | **२०२२-२३** | **२०२३-२४** |
| रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) | ८१२.१३ | ११२४.५४ | १००.०० | १८५०.०० |
| सर्वसाधारण जिवायो ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४-२२०३) | ३८००.०० | २३३४.९८ | २४.०० | ५०४.४४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण जिवायो इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण (५०५४-४७११) | - | १११५.०० | - | ६०.०० |
| आदिवासी जिवायो टीएसपी/ ओटीएसपी/ माडा (३०५४-०३६३/ ३०५४-०४०७/ ५०५४-०४०२) | ५२४.८० | ४९४.२० | ९६५.०० | ५६५.०० |
| आदिवासी राज्यस्तर ओटीएसपी (३०५४-२७२२) | - | - | ३०००.०० | - |
| नाविन्यपूर्ण योजना ३.५-४.५ % (३४५१-१८९३) | ४८७.०० | ६१.९० | ९८.८५ | १२.०० |
| मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना | - | - | १५४१.०० | ६७३६.०० |
| एकूण | ५६२३.९३ | ५१३०.६२ | ५७२८.८५ | ९७२७.४४ |

तसेच यापुढेही जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्ते/पूलांच्या कामांकरिता अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम व अन्य योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील जिल्हा स्त्री रुग्णालय व सामान्य रुग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत.**

**(३४) ७२९६५ (०६-०३-२०२४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयात जन्मत: शिशुचे आधार कार्ड देण्याची योजना रुग्णालय प्रशासन आणि पोस्ट ऑफिसमार्फत सुरु केली, तथापि रुग्णालयाच्या परिसरात दलालांमार्फत आधार कार्ड करुन देण्याचे प्रकार सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील (इर्विन) केंद्रीय प्रयोगशाळाचे बांधकाम पूर्ण झाले असून येथे रक्ताशी संबंधित सर्व आजारांचे नमुने घेणे व चाचण्या करणारे तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री नसल्याने रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय परीसरात कार्यरत असलेल्या दलालावर कारवाई करणेसह जिल्हा सामान्य रुग्णालयातील केंद्रीय प्रयोगशाळेमधील तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील स्त्री रुग्णालयात जन्मत: शिशुचे आधार कार्ड देण्याची योजना पोस्ट ऑफीस मार्फत माहे डिसेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ पर्यंत राबविण्यात आली होती. तथापि मनुष्यबळाच्या अभावामुळे पोस्ट ऑफीस मार्फत राबविण्यात येणारी सदरची योजना स्थगित केलेली आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३५) ७३०१५ (२५-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १४ जिल्ह्यांना सन २०१३ पासून आत्महत्याग्रस्त म्हणून घोषीत केल्यानंतर शासनामार्फत एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना धान्य देण्यात यावे व रोख रक्कम (डीबीटी) योजना बंद करुन धान्य पुरवठा पुर्ववत करण्यात यावा, स्वस्त धान्य दुकानदार यांना प्रति क्विंटल ६००/- रुपये कमीशन शासनामार्फत वा अन्यथा ५००००/- रुपये मानधन देण्यात यावे, तसेच एपीएल शेतकरी योजनेतील शिधा पत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावे इत्यादी विविध मागण्या परभणी जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, परभणी यांच्यावतीने शासनाकडे वारंवार करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट रोख रक्कम हस्तांतरण (Direct Benefit Transfer-DBT) माध्यमातून पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट रोख रक्कम वितरित करणे, असे शासनाचे धोरण आहे.

त्यानुसार राज्यातील १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१५०/- इतकी रक्कम रोख रकमेच्या थेट हस्तांतरणान्वये (Direct Benefit Transfer-DBT) लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात आली आहे. प्रतिवर्षी किमान आधारभूत किंमतीत होणाऱ्या वाढीनुसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या Cash transfer of Food Subsidy Rules, २०१५ मधील तरतुदीनुसार एप्रिल, २०२४ पासून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१७०/- इतक्या रोख रकमेचे वितरण करण्यात येत आहे.

तसेच, रास्तभाव दुकानदार यांना विविध योजनेंतर्गत ई-पॉस मशीनद्वारे होत असलेल्या व्यवहारानुसार वितरीत शिधावस्तुंच्या विक्रीस रू.१५०/- प्रति क्विंटल मार्जिन देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) या ग्रामपंचायतीस दैंनदिन**
**३० लक्ष लिटर पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३६) ७३१०३ (२९-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) या ग्रामपंचायतीस दैनंदिन ३० लक्ष लिटर पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उदयोग मंत्री यांना दिनांक ०४/०२/२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुसार हिजवडी ग्रामपंचायतीला ३० लक्ष लिटर पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मा. उद्योग मंत्री यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, MIDC यांना सदर प्रस्ताव तपासून सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.
तथापि, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मुळशी टप्पा-२ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत हिंजवडी गावासाठी १५ लक्ष लीटर क्षमतेच्या २ टाक्या, ७.५० लक्ष लीटर क्षमतेची १ टाकी, ८.५० लक्ष लीटर क्षमतेची १ टाकी व जवळपास ७७ कि.मी. लांबीच्या वितरण व्यवस्थेचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माण ग्रामपंचायत (ता.मुळशी, जि.पुणे) या ग्रामपंचायतीस पाणी पुरवठ्यात वाढ तसेच वाढीव नळ जोडणी करण्याबाबत**

**(३७) ७३१०५ (२९-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण (ता.मुळशी, जि.पुणे) या ग्रामपंचायतीस वाढीव पाणी पुरवठा तसेच वाढीव नळ जोडणी करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने वाढीव पाणी पुरवठा व वाढीव नळ जोडणी करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जल जीवन मिशन अंतर्गत मुळशी टप्पा २ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मुळशी जि.पुणे या योजनेसाठी शासन निर्णय, दिनांक २१ जून २०२२ अन्वये रू.३८२.७३ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच मुख्य अभियंता, म. जी. प्रा. प्रादेशिक विभाग, पुणे यांनी दिनांक ६ जून २०२२ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सदर योजनेमध्ये एकूण २२ गावांचा समावेश आहे. यामध्ये माण हे गाव समाविष्ट असून खालीलप्रमाणे उपांगे मंजूर करण्यात आली आहेत.
अ) ४ उंच साठवण टाक्या
i) गावठाण क्षमता - ५,१०,००० ली.
ii) भोईरवाडी जि. प. शाळा क्षमता - ७,०६,००० ली.

iii) बोडकेवाडी क्षमता- ६,३७,००० ली.
iv) गवारेवाडी क्षमता- ३९,००० ली.
ब) १ बैठी टाकी
i) भोईरवाडी क्षमता- १,२८,००० ली.
क) २ संपवेल
i) भोईरवाडी क्षमता - १,८८,००० ली.
ii) बोडकेवाडी क्षमता-१,४३,००० ली.
ड) वितरण व्यवस्था- ७८ कि.मी.
दोन उंच पाण्याच्या टाकीचे काम सुरू झाले आहे. बाकीच्या टाकीचे काम हे जागा ताब्यात नसल्यामुळे अद्याप सुरू झाले नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतनची इमारत दुरुस्तीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत**

**(३८) ७३१८३ (१४-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतनची इमारत ६० वर्षे जुनी आहे हे खरे आहे काय,
(२)असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव शासकीय तंत्रनिकेतन असून राज्य भरातून विद्यार्थी-विद्यार्थीनी येथे शिक्षणासाठी येतात परंतू येथील इमारत अत्यंत जुनी असून अनेक ठिकाणी पडझड झालेली असल्यामुळे दुरुस्तीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रस्ताव मंजूर होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-०७-२०२४) :** (१), (२) व (३) होय.
(४) शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेतील विविध इमारतींची दुरुस्ती व पायाभूत सुविधांची कामे तसेच आवश्यक दुरुस्ती (फेसलिफ्टिंग) करण्यास उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दि.२२.०२.२०२४ अन्वये एकूण रु.८९३.८८ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून, निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत प्रगती पथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यासह दुष्काळी तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(३९) ७३३७० (२९-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यासह दुष्काळी तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पावसाअभावी खरीप पीके वाया जाणे, ओढे, नाले कोरडे असून तलावांनी तळ गाठणे, विहिरी, कुपनलिकांमध्ये पाणी नसणे, पाण्यासाठी अनेक गावांत टँकर सुरु असणे, तसेच गावात प्रथम पाणी यावे म्हणून जत पूर्वभागातील काही गावांमध्ये म्हैसाळ योजनेच्या पाण्याचे पाईप फोडणे, कॅनॉलमध्ये दगड टाकण्याचे प्रकार सुरु असणे, अशा समस्या उद्भवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उद्भवलेल्या समस्यांची दखल घेऊन पाणी प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुरेशा पावसाअभावी अनेक ओढे नाले कोरडे असुन, अनेक तलावांनी तळ गाठले आहेत. अनेक विहिरी, कूपनलिकामध्ये पाणी नाही. त्यामुळे सांगली जिल्ह्यामध्ये जत व आटपाडी तालुक्यात अनेक गावामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला त्यानुसार दि.२४.११.२०२३ अखेर पिण्याच्या पाण्यासाठी एकुण ३६ टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु होता. सदर कालावधीत टंचाई परिस्थिती असल्याने सदर ठिकाणी स्थानिकांकडून तात्पुरत्या स्वरुपात व्हॉल फिरविणे, पाणी घेणे इत्यादी प्रकार घडले असून सदर बाब निदर्शनास येताच आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन सिंचन आर्वतन पूर्ववत व सुस्थितीत करण्यात आले आहे.
(३) शासन निर्णय, महसुल व वन विभाग दि.३१.१०.२०२३ अन्वये सांगली जिल्हयातील शिराळा, कडेगाव, खानापूर, विटा व मिरज या तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे. दुष्काळी तालुक्याव्यतिरिक्त जत तालुक्यात माहे जून ते सप्टेंबर-२०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्केपेक्षा कमी व पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झालेले आहे अशा ९ महसुल मंडळांमध्ये महसुल व वन विभाग शासन निर्णय दि.१०.११.२०२३ व १६.०२.२०२४ अन्वये दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक २०/०७/२०२३ ते दि. २०/१०/२०२३ पर्यंत टंचाई आवर्तनाअंतर्गत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत जत तालुक्यातील ५८ गावांतील विविध नाले, सिमेंट बंधारे व लघु पाटबंधारे तलावामध्ये पाणी सोडण्यात आले आहे. तसेच जत व आटपाडी तालुक्यात टॅकर्सच्या मागणीप्रमाणे टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू आहे. या प्रमाणे पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही

---

## सांगली जिल्ह्यातील ६९ गावांमध्ये पाण्याचे नमूने दुषित असल्याबाबत

**(४०) ७३३८३ (२९-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील १ हजार १६१ ठिकाणच्या पाण्याचे नमूने घेण्यात आले असता ६९ गावांतील ७२ पाण्याचे नमूने दूषित आले असून या पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी पाणी योजनांसह शुध्दीकरणावर कोटयवधी रुपयांचा खर्च करुनही गावातील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील ६९ गावांतील नागरिकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०६-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२३ ते नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत केलेल्या रासायनिक तपासणीच्या अहवालानुसार, सांगली जिल्हयातील ६१६ गावांतील पाणी नमुन्यांची रासायनिक तपासणी केली असता, त्यापैकी १० गावांतील १२ नमुने (TDS) क्षार बाधित आढळले आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर क्षार बाधित १० गावांमध्ये पर्यायी स्त्रोत उपलब्ध असल्याने, नागरिकांना इतर पिण्याचे पाण्याचे स्त्रोत वापरण्यासंबंधी क्षेत्रिय कार्यालयाव्दारे सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत संबंधित ग्रामपंचायतींनी बाधित आढळून आलेल्या स्त्रोतांचे शुध्दीकरण करुन,
पाणी नमुने फेरतपासणीसाठी पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळाकडील, पाणी नमुने तपासणीअंती पाणी पिण्यायोग्य असल्याचे आढळून आले आहे.

सदरहू कालावधीत संबंधित गावांमध्ये कोणत्याही प्रकारची जलजन्य आजाराची साथ उद्भवल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रदीर्घ कालावधीनंतर दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांचे फेर सर्वेक्षण करणेबाबत**

**(४१) ७३३९८ (०५-०३-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांचे सर्वेक्षण होऊन २१ वर्षे झाली असून या प्रदीर्घ कालावधीत अनेक कुटूंबे दारिद्र्य रेषेच्यावर आली तर काही कुटूंबे अत्यंत गरीबीत जीवन जगत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यात २००२ मध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांचे सर्वेक्षण झाले त्यावेळी ८८ हजार ६९८ कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली असल्याचे दर्शविण्यात आले तोच आकडा अद्यापही कायम असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर प्रकरणी चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या लक्षात घेता शासनाने दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांचे फेर सर्वेक्षण करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबगणना - २००२ करण्यात आली. सदरील दारिद्रयेरेषेखालील कुटुंबगणना ही केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १३ सामाजिक व आर्थिक निकषाच्या आधारे Score based Ranking नुसार करण्यात आलेली आहे.

दरम्यान १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण कार्यक्रम २०११ (SECC - २०११) राबविण्यात आला. सर्वेक्षणाच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यातील अंतिम याद्या मार्च, २०१६ अखेर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर डेटा चा वापर केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता करण्यास सुरुवात झाली आहे.

SECC (Socio Economic and Caste Census)-२०११ च्या सर्वेक्षणानुसार वाशिम जिल्हयातील ग्रामीण भागात एकूण २२३२५८ कुटूंबे (Online Report नुसार) आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबगणना - २००२ व सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण २०११ कार्यक्रम (SECC-२०११) हे दोन्ही सर्वेक्षण केंद्र शासनामार्फत करण्यात आले असून सध्या दोन्ही सर्वेक्षण पूर्ण झालेली आहेत. सदर याद्यांमध्ये बदल करणे, याबाबत केंद्र शासनाकडून सध्या सूचना प्राप्त नाहीत.

---

### "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती"योजनेंतर्गत बँकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबाबत

**(४२) ७३४०२ (२५-०२-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुशिक्षित बेरोजगार व उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्या तरुणांना स्वत:चा एखादा लघु उद्योग सुरु करता यावा, या उद्देशाने उद्योजकांना चालना देण्यासाठी "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती" योजनेची सुरुवात केली, त्याअंतर्गत कर्ज मिळावे यासाठी तरुण मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल करीत आहेत, परंतू बँकांकडून कर्ज देण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने अनेकांचे व्यवसाय खोळंबले असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील १,३७३ तरुणांनी बँकांकडे कर्जासाठी दाखल केलेल्या अर्जांपैकी केवळ १९३ जणांनाच आतापर्यंत कर्ज मंजूर झाले, तर विविध बँकांकडे ५०३ कर्ज प्रस्ताव प्रलंबित असून ६७७ जणांचे कर्ज प्रस्ताव बँकानी फेटाळले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने उक्त प्रलंबित प्रकरणे निकालात काढून बेरोजगार तरुणांना व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०२३-२४ मध्ये, माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत २७९६८ कर्ज प्रकरणांची बँकांना शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी ५११७ कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून १५७२० कर्ज प्रकरणे बँकांकडून नामंजूर करण्यात आली आहेत. आणि ७१३१ कर्ज प्रकरणे बँकांकडे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही,

सन २०२३-२४ वर्षामध्ये वाशिम जिल्ह्यातून १२४६ कर्ज प्रकरणांची बँकांकडे शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी ४१७ कर्ज प्रकरणे मंजूर झाली आहेत. उर्वरित ६५२ कर्ज प्रकरणे बँकांकडून नामंजूर करण्यात आली आहेत. जिल्ह्यांचे सुधारीत लक्षांक ४०६ असून या आर्थिक वर्षासाठीचे १००% उदिष्ट पूर्ण झाले आहे.

(३) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बँकांचे प्रतिनिधी व जिल्हास्तरीय यंत्रणांची बैठक आयोजित केली जाते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत बँकांकडून प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात येत असून योजनेंतर्गत उदिष्ट पूर्ण करण्याकरीता सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील शासकीय तंत्रानिकेतनाच्या वसतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४३) ७३८४४ (१४-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील शासकीय तंत्रानिकेतनाच्या वसतिगृहाची दयनीय अवस्था झालेली असून विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहात ४९ प्राध्यापकांची आवश्यकता असतांना केवळ २३ प्राध्यापक कार्यरत असल्याने शैक्षणिक नुकसान होणे, वसतीगृहाला एक/दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात असणे, वर्गात बसविण्यात आलेले पंखे बंद अवस्थेत असणे, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण मिळणे इत्यादी अनेक समस्या असून सदर समस्या तात्काळ दूर न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा मातृत्व आधार फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्राचार्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उचित योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-०७-२०२४) :** (१) नाही.

संस्थेने सादर केलेल्या वसतिगृहाच्या बांधकामाचे प्रस्ताव मंजूर होऊन सा.बा.विभागामार्फत रु.१.६२ कोटी निधीमधून सदरच्या वसतिगृह दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून वसतिगृह वापरात आहे.

(२) अंशत: खरे आहे.

विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत मातृत्व आधार फाऊंडेशन यांनी दि. १ सप्टेंबर, २०२३ रोजी प्राचार्यांची भेट घेऊन आंदोलनाचा तोंडी इशारा दिला होता. त्यानंतर संस्थेचे प्राचार्य याच्यांशी चर्चा करुन शंकांचे निरसन करण्यात आले आहे.

शासकीय तंत्रनिकेतन, मालवण या संस्थेच्या आस्थापनेवर शिक्षकीय पदे ही वसतिगृहासाठी मंजूर नाहीत. सद्यस्थितीत शिक्षकीय ५९ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे भरलेली आहेत. सदर शिक्षकीय पदांचा आढावा मंजूर करण्याची कार्यवाही सुरु असून पदांच्या आढाव्याअंती अध्यापकांच्या पदभरतीची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येईल.

वसतिगृहाच्या व्यवस्थापनासाठी वर्ग १ दर्जाच्या अधिव्याख्याताची कुलमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली असून, मुला-मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारी कार्यरत अधिव्याख्यात्यांकडे सोपविण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुलांच्या वसतिगृहाकरीता १ पुरुष सुरक्षारक्षक व मुलींच्या वसतिगृहाकरीता १ महिला सुरक्षारक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

वसतिगृहाला मालवण नगरपालिकेकडून नियमितपणे पाणीपुरवठा केला जात आहे. MEDA यांच्यामार्फत मंजूर झालेल्या निधीमधून मुख्य इमारत, मुल/मुली वसतिगृह यामध्ये २५४ पंखे व २५६ टयुबलाईट बसविण्यात आली आहेत.

वसतिगृहातील मुलांच्या मेसमधील जेवण व जेवणाच्या दर्जाबाबत विद्यार्थ्यांकडून समस्या नाहीत. तसेच याकरीता संस्थास्तरावर कुलमंत्री व अधिकारी यांची समिती नेमलेली असून समितीकडून वेळोवेळी जेवणाच्या दर्जाबाबत तपासणी करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरपूर, माळेगांव, खडका, वारंगा (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पुलांच्या दुरुस्तीबाबत

**(४४) ७४०२५ (२९-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर, माळेगांव, खडका (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पुलांचे माहे जुलै,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून हे पूल धोकादायक झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच महागांव ते वारंगा (जि.यवतमाळ) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर पुलांचे अर्धवट काम, रस्त्यामधील चढउतार, ठिकठिकाणी पडलेले खड्डे, अर्धवट असलेली रस्त्यांची कामे, जोडरस्ते समांतर नसल्यामुळे वाहतूकीला अडथळा होत असल्याची बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुल व रस्ते दुरुस्तीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर महामार्ग केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. माहे जुलै २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मौजे खडका येथील छोट्या पुलास किरकोळ नुकसान झाले होते. संबंधित कंत्राटदाराने माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये पुलाची दुरुस्ती पुर्ण केली असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(२) हे खरे आहे.

सदरील काम मुळ सवलतदार यांनी वेळेत पुर्ण न केल्यामुळे रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अडचणी आल्या होत्या. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी मुळ सवलतदाराच्या जोखीमेवर माहे डिसेंबर, २०२२ मध्ये स्वतंत्र निविदेद्वारे देखभाल दुरुस्तीचे काम हाती घेवून ते पुर्ण केले आहे.

(३) प्रस्तावीत काम पुर्ण करण्यासाठी मूळ सवलतदाराच्या जागी नवीन सवलतदाराची नेमणूक केली असून सद्यास्थितीत ९०.९६ टक्के काम पुर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हा परिषदेत असलेल्या ८२ ग्रामपंचायतींनी आर्थिक व्यवहाराचे अभिलेखे लेखा परिक्षणास सादर न केल्याबाबत

**(४५) ७४१६२ (०६-०३-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेत असलेल्या ८७७ ग्रामपंचायतींपैकी ८२ ग्रामपंचायतींनी आर्थिक व्यवहाराचे अभिलेखे लेखा परिक्षणास सादर केले नसल्याचे जिल्हा परिषदेने सादर केलेल्या अहवालात माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त अहवालानुसार संबंधित ग्रामपंचायतींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) एकूण ८७० ग्रामपंचायतीपैकी ८१ ग्रामपंचायतीनी आर्थिक व्यवहाराचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नव्हते तत्कालीन सचिव यांनी कार्यरत सचिव यांना अभिलेखे हस्तांतरीत न केल्याने कार्यरत सचिव हे ग्रामपंचायतचे नियमित लेखापरीक्षण करतेवेळी लेखा परीक्षकास अभिलेखे उपलब्ध करून देऊ शकले नाही असे चौकशीत दिसून आले. ८१ ग्रामपंचायतीपैकी ४४ ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण पूर्ण झाले असून उर्वरित ३६ ग्रामपंचायतीचे अभिलेखे हस्तांतरण न केल्याने जबाबदार तत्कालीन सचिव यांनी ७ दिवसाच्या आत कार्यरत सचिव यांना प्रभार/अभिलेखे सादर न केल्यास त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १७९ व १८० मध्ये असलेल्या तरतुदी नुसार जिल्हाधिकारी यांचेकडे कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबतचे निर्देश संबधित ग्रामपंचायत व पंचायत समिती यांना देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना धान्य ऐवजी थेट रोख रक्कम खात्यात जमा न झाल्याबाबत**

**(४६) ७४१६७ (२५-०२-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्यावतीने आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधे प्राधान्य गटातील शेतकऱ्यांना जानेवारी महिन्यापासून धान्याऐवजी पैसे देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानंतर सिस्टिम पूर्ण क्षमतेने चालत नसल्याने बुलढाणा जिल्ह्यातील ८२ हजार शेतकऱ्यांना धान्यही बंद झाले व पैसेही मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बुलढाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना धान्य ऐवजी थेट रोख रक्कम खात्यात जमा करण्याच्या योजनेमध्ये जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत लाभ मिळाला नसल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेचा लाभ न मिळालेल्या वंचित शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यामध्ये माहे फेब्रुवारी-२०२३ अखेर एपीएल (केशरी) शिधापत्रिका संख्या ८२००० एवढी असून त्यापैकी १५४५४ शिधापत्रिकाधारक यांना माहे फेब्रुवारी-२०२४ अखेर प्राधान्य योजनेमध्ये वर्ग करून त्यांना धान्याचा लाभ सुरू करण्यात आलेला आहे. उर्वरित ६६५४६ एपीएल (केशरी) शिधापत्रिकांपैकी ४०३३९ शिधापत्रिकाधारकांनी तहसिल कार्यालयामध्ये DBT चा लाभ मिळण्याकरीता अर्ज केला होता. त्यापैकी २८३२२ शिधापत्रिकाधारक यांची यादी जिल्हा पुरवठा कार्यालयास प्राप्त होऊन त्यांना जानेवारी-२०२३ ते फेब्रुवारी-२०२४ पर्यंत ५,०९,१५,६९०/- एवढी रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. उर्वरित १२०१७ शिधापत्रिकाधारकांना रोख रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, २६२०७ शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्याचा तपशिल संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) बुलढाणा जिल्ह्यातील रास्तभाव दुकानदार व तलाठी यांच्यामार्फत एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थी यांना वारंवार सुचना देऊन तहसिल कार्यालय येथे बँक खाते तपशिल जमा करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात अद्ययावत क्रीडा सुविधांची निर्मिती करण्याबाबत

**(४७) ७४२१७ (२९-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "नागपूर शहरात अद्ययावत क्रीडा सुविधांची गरज असून शहरात ही सुविधा उपलब्ध झाल्यास अनेक खेळाडूंना मोठ्या स्पर्धेच्या तयारीसाठी अन्य शहरात वा विदेशात भटकंती करण्याची गरज पडणार नाही", अशी खंत आशियाई तिरंदाजी स्पर्धेत तीन सुवर्णपदक विजेता तिरंदाज श्री.ओजस देवतळे याने दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शहरात अद्ययावत क्रीडा सुविधांची निर्मिती झाल्यास अनेक प्रतिभावंत खेळाडूना न्याय मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने नागपूर शहरात अद्ययावत क्रीडा सुविधांची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०७-२०२४) :** (१), (२) व (३) नागपूर शहरामध्ये जिल्हा क्रीडा संकुल, नागपूर येथे विविध खेळांच्या क्रीडा सुविधा निर्मिती करीता रु. २२३९.५२ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, नागपूर विभागीय क्रीडा संकुलासाठी यापूर्वी रु. ५१.२० कोटी निधी राज्य योजनेतून व जिल्हा नियोजन समितीकडून क्रीडांगण विकास योजनेतून रु. १२.०० कोटी असा एकूण रु.६३.२० कोटी निधी क्रीडा सुविधा व अनुषंगीक कामांसाठी वितरीत करण्यात आला आहे. नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलास राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा दि.१३.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेला आहे. त्यानुसार विभागीय क्रीडा संकुल नागपूर येथे विविध खेळांच्या अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण होणार असून इतर क्रीडा सुविधांसह आर्चरी या खेळाची सुविधा देखील निर्माण करण्यात येणार आहे. सदर कामाकरीता रु.६८३.७९ कोटी इतक्या किमंतीच्या क्रीडा बाबींच्या अंदाजपत्रक व आराखड्यास मान्यता देण्यात आलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये मिळणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करणेबाबत

**(४८) ७४४०८ (११-०३-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलाकरिता मिळणारी एक लाख तीस हजार रक्कम अत्यंत कमी असल्यामुळे लाभार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागत असून त्यांना कर्ज घेऊन बांधकाम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५०० चौरस फूट घर बांधण्याकरिता आजचे बांधकाम साहित्यांची किंमत पाहता रुपये पाच लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलाच्या अनुदानात वाढ करून देण्याबाबत शासनाने धोरण आखून उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) व त्याच धर्तीवर इतर राज्य योजना राबविल्या जातात.

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रु.२.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दि.०१.०८.२०२२ रोजीच्या तसेच मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या दि. २७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दहीहंडी उत्सवाला आंतरराष्ट्रीय खेळाचा दर्जा देण्याबाबत**

**(४९) ७४५०५ (२९-०२-२०२४). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दहीहंडीला मा.मुख्यमंत्री महोदयांनी खेळाचा दर्जा देण्याची घोषणा करुन एक वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने शेकडो दहीहंडी खेळाडू दर्जा न मिळाल्यामुळे वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दहीहंडी उत्सवात तरुणांचा मोठा सहभाग असून ते एक दोन महिना आधी दहीहंडीला सराव करीत असल्याने या खेळाचा प्रसार व्हावा यासाठी खेळाचा दर्जा देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार सदर दहीहंडी उत्सवाला आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाचा दर्जा मिळण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०७-२०२४) :** (१), (२) व (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट, २०१६ अन्वये मानवी मनोरे उभारण्याच्या प्रकारास (खेळास) साहसी खेळाचा दर्जा देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाचा दर्जा देण्यासाठी त्या खेळाचे नियम व निकष निश्चित होणे आवश्यक असून खेळाचे नियम व निकष ठरविण्याची बाब ही संबंधित खेळाच्या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटनेशी संबंधित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर व जिल्ह्यात घरकुलासाठी जागा नसणारे लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(५०) ७५०१५ (०६-०३-२०२४). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व जिल्ह्यात घरकुलासाठी जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांसाठी रुपये पन्नास हजारांमध्ये जागा खरेदी करता येत नसल्याने लाभार्थ्यांना घरकुल योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या रुपये पन्नास हजार रुपयांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव पुणे जिल्हा परिषदेने शासनास पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक ०६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत ग्रामीण भागातील भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानाच्या रक्कमेत रु. ५०,०००/- यात वाढ करुन प्रती लाभार्थी रु. १,००,०००/- याप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.